मार्गदर्शन

# भाजीपाल्याचे काढणीपश्चात व्यवस्थापन




**प्रा. प्रशांत देबाजे**
(मो.नं. ९४२०१००४०१)
उद्यानविद्या महाविद्यालय,
मुळदे, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग




आपला भारत भाजीपाला उत्पादनात चीननंतर दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. मात्र उत्पादित भाजीपाला हा अयोग्य काढणी, हाताळणी व वाहतूक यांमुळे मोठ्या प्रमाणात नाश पावतो. भाजीपाल्याची योग्य काढणी, हाताळणी आणि वाहतूक केल्यास नुकसानीचे प्रमाण कमी होऊ शकेल. यासाठी काढणीची वेळ आणि बाजारातील भाजीपाल्याची उपलब्धता हे घटक विचारात घेणे गरजेचे आहे.

**वि**विध भाजीपाला पिकांच्या काढणीपश्चात व्यवस्थापनाची माहिती प्रस्तुत लेखातून घेऊ. आपले कृषी उत्पादन नफाक्षम होण्यासाठी पिकांच्या तोडणीची अचूक वेळ, वाहतूक आणि ग्राहकांची मागणी या बाबी विचारात घेतल्या पाहिजेत.

**टोमॅटो** : रोपांच्या लागवडीनंतर अडीच ते तीन महिन्यांनी फळांच्या काढणीला सुरूवात होते. उपलब्ध असलेली वाहतुकीची साधने आणि बाजारपेठेचे अंतर



लक्षात घेऊनच टोमॅटो फळांची काढणी गरजेनुसार करावी.

फळाच्या वाढीच्या अवस्थेनुसार फळे तोडावीत. हिरव्या पक्व अवस्थेतील फळे लांबच्या बाजारपेठेसाठी योग्य असतात. घरी खाण्यासाठी किंवा स्थानिक बाजारपेठेकरिता झाडावरच पक्व लाल झालेली फळे तोडावीत. प्रक्रिया उद्योगासाठी- जसे टोमॅटोपासून सॉस, सूप, चटणी आणि केचअप तयार करण्याच्या उद्देशाने झाडावर पूर्ण पिकलेली लाल रंगाची आणि किंचित मऊसर फळे तोडावीत.

**मिरची** : मिरची पिकांची तोडणी ही त्याच्या उपयोगानुसार करावी. भाजी किंवा लोणचे तयार करण्याकरिता पूर्ण वाढलेल्या हिरव्या रंगाच्या मिरच्या तोडाव्यात. पूर्ण पिकलेल्या आणि वाळलेल्या मिरचीपासून पावडर तयार केली जाते. ढोबळी मिरची ही पूर्ण पक्व तयार झाल्यानंतर तोडावी.

**काकडी** : काकडीवर्गीय पिकांमध्ये काकडी, भोपळा, कलिंगड, टिंडा, दोडका, घोसाळा, पडवळ, कारली, खरबूज, कोहळा आणि तांबड्या भोपळ्याचा समावेश होतो. काकडीचे बी टोकल्यापासून साधारणत: ३० ते ४० दिवसांनी फळे लागतात. फळे येण्यास सुरूवात झाल्यापासून दर दोन ते चार दिवसांनी फळे तोडावीत. काकडी कोवळी फिक्कट हिरव्या रंगाची किंवा गडद हिरवी झाल्यावर तोडावी. तांबूस, तपकिरी छटा दिसू लागली की काकडी जरठ झाली असे समजावे. वाढ झाल्यानंतर फळे कोवळी असताना काढावीत. फळांवर नखांनी हळूच दाबले



असता नखांचे व्रण उमटल्यास फळ कोवळे आहे, असे समजून काढणीस सुरूवात करावी.

कोवळ्या फळांवर बारीक मऊ लव असते, फळे जुनी झाल्यावर लव नाहीशी होते अथवा कमी प्रमाणात असते. तांबडा भोपळा आणि कोहळे पूर्ण पक्व झाल्यावरच काढणे योग्य असते. पूर्ण पक्व झालेल्या फळांचे देठ सुकलेले असतात. तांबड्या भोपळ्याचा रंग बदलून तो पिवळसर किंवा पिवळा नारंगी होतो.

**दोडका आणि घोसाळी** : यांना लागवडीनंतर साधारणत: दोन महिन्यांनी फळे येतात. आकाराने पूर्ण वाढलेली परंतु कोवळी फळे काढणीकरिता योग्य असतात. फळाला नखाने हळूच दाबल्यावर फळावर व्रण पडल्यास



फळ कोवळे आहे असे मानावे.

**कारले, पडवळ** : कारले काढतेवेळी फळे कोवळी असतानाच काढावीत. जर फळे काढणीस उशीर झाला तर ती वेलीवरच पिवळी अथवा नारंगी होतात आणि फुटून त्यातील बिया गळून पडतात. म्हणून पूर्ण वाढलेली पण कोवळी फळे काढणे आवश्यक आहे. पडवळाची फळे पूर्ण

वाढलेली आणि कोवळी असतानाच काढावीत. उशिरा काढलेली फळे आतून पोकळ होतात, अशा फळांची मागणी कमी होते आणि भाव मिळत नाही.

**कलिंगड :** फळांची काढणी फळे पूर्ण पक्व झाल्यानंतरच करावी. नदीच्या पात्रात लागवड केलेली फळे ही बागायती पिकापेक्षा थोडी लवकर काढणीसाठी येतात. बी पेरल्यानंतर साधारणपणे ३ ते ३.५ महिन्यांनी कलिंगडाच्या फळाच्या काढणीस सुरूवात होते आणि त्यानंतर एका महिन्यात फळांची काढणी पूर्ण होते. देठाजवळील पाने सुकली की फळ पक्व झाले असे मानावे. तयार फळ हातांनी ठोकून पाहिल्यास बद-बद असा आवाज येतो. फळ कच्चे असल्यास टण-टण असा आवाज येतो. कलिंगडाचा जमिनीला स्पर्श करणारा भाग पिवळा झाल्यास तयार फळातून कर्र असा आवाज येतो. कलिंगडाचे फळ तयार झाले की नाही हे लक्षणांवरून, खुणा पडताळून किंवा अनुभवाच्या सहाय्याने जाणावे.



**खरबूज :** फळ पिकले असता त्याला थोडासा धक्का दिल्यास ते देठापासून वेगळे होते. हे खरबूज परिपक्व झाल्याचे प्रमुख लक्षण आहे. फळांच्या सालीवर जाळी असलेल्या जातीत जाळीच्या मधली जागा पिवळसर झालेली दिसली की फळ पिकले आहे असे मानावे. खरबुजाच्या पक्व झालेल्या फळांना विशिष्ट प्रकारचा सुगंध येतो. या सुगंधावरून फळ पक्व झाले असे समजावे.



**तोंडली :** तोंडलीची काढणी आतील बिया पक्व होण्यापूर्वी करावी. जास्त दिवस वेलीवर राहिलेली तोंडली कडक- कठीण होतात आणि आतील भाग- गर तांबडा होतो. फळाचा वाळलेला भाग फळापासून वेगळा होण्यापूर्वी फळांची तोडणी करावी.

**शेंगवर्गीय भाज्या :** शेंगवर्गीय भाज्यांमध्ये वाल, चवळी, घेवडा, गवार या भाज्यांचा समावेश असतो. त्यापैकी घेवड्याची बी लावल्यापासून सुमारे दोन महिने वाढल्यानंतर; परंतु दाणे फुगीर होण्यापूर्वी शेंगांची काढणी करावी. गवारीचा विचार करता, भाजीसाठी हिरव्या कोवळ्या, परंतु पूर्ण वाढलेल्या गवारीच्या शेंगांची नियमित काढणी करावी. पक्व झालेल्या शेंगांत रेषांची वाढ होते आणि साल कठीण झाल्यामुळे त्या लवकर शिजत नाहीत. त्यामुळे गवारीच्या शेंगा कोवळ्या असतानाच तोडाव्यात. काढणी दर ३-४ दिवसांनी करावी. चवळीच्या शेंगा कोवळ्या असतानाच तोडाव्यात. वाटाण्याच्या विविध जातींनुसार ६० ते ८० दिवसांत लागवडीनंतर शेंगांची काढणी करता येते.

**भेंडी :** भेंडी लागवडीपासून ४५ ते ५० दिवसांनी भेंडीला फळे येतात. फुले उमलल्यापासून चौथ्या ते सहाव्या दिवसापासून काढणी करताना साधारणत: ६-८ सें.मी. लांबीची कोवळी भेंडी काढावी. भेंडीची काढणी लवकर केल्यामुळे फळांची प्रत चांगली राहून उत्पादनात वाढ होते. भेंडीची तोडणी सकाळी केल्यास भेंडीचा रंग आणि तजेला जास्त काळ टिकून राहण्यास मदत होते. टोकाकडील भाग वाकविल्यास तो सहज तुटणे हे भेंडींच्या कोवळेपणाचे लक्षण आहे. ■

